# नागपूर सुधार प्रन्यास

स्टेशन रोड, सदर, नागपूर.

(संकेतस्थळ– www.nitnagpur.org)

## जा हि रा त

नागपूर सुधार प्रन्यासमध्ये खाली नमूद केल्यानुसार अधिकारी/कर्मचारी यांची तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने नेमणूक करण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | पद संख्या | किमान शैक्षणिक अर्हता/ आवश्यक अनुभव |
|---|---|---|---|
| १ | उद्यान अधीक्षक | १ | बी.एस्सी.(ॲग्रीकल्चर/हॉर्टिकल्चर)<br>उद्यान विषयक किमान गट 'ब' मधील पर्यवेक्षकीय कामाचा तीन वर्षांचा अनुभव. |
| २ | माहिती व जनसंपर्क अधिकारी | १ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कला, वाणिज्य, विज्ञान किंवा विधी शाखेतील पदवी आणि पत्रकारितेची पदविका धारण केलेली असावी. इंग्रजी आणि मराठी भाषेवर प्रभुत्व असावे.<br>गट 'ब' वरील पदाचा किमान तीन वर्षांचा अनुभव. |
| ३ | लिपीक | ३ | आस्थापनीय बाबी व अन्य लिपीकीय कामाचा/संगणकीय कामाचा अनुभव |
| ४ | मराठी लघुटंकलेखक | ३ | लघुलेखनाचा वेग किमान १०० श.प्र.मि. आणि मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० श.प्र.मि. या अर्हतेचे शासकीय वाणीज्य प्रमाणपत्र व लघुलेखन/टंकलेखनाचा पुरेसा अनुभव आवश्यक. |

१) अर्जदार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेला असावा. नागपूर सुधार प्रन्यास कार्यालयातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

२) कमाल वयोमर्यादा ७० वर्ष (६५ वर्षाखालील व्यक्तींना प्राधान्य)

३) अर्जदाराविरुध्द विभागीय चौकशी चालू/प्रस्तावित नसावी.

४) कर्मचारी शारीरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.

सदर नेमणूकीचा कालावधी प्रथमत: ११ महिन्यांचा राहील. शासन नियमानुसार नेमणूकीचे मासिक परिश्रमीक हे सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेले एकूण वेतन (मूळ वेतन व महागाई भत्ता) मधून आता मिळत असलेले एकूण निवृत्ती वेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्ती वेतन) वजा केल्यानंतर होणारी रक्कम मासिक परिश्रमीक म्हणून निश्चित करण्यात येईल. अशा परिश्रमीक रक्कमेची कमाल मर्यादा मासिक रु. ४०,०००/– इतकी मर्यादीत राहील. तसेच करार पध्द्तीने नियुक्ती करण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

//२//

आवश्यकतेनुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची संख्या कमी/अधिक करण्याचे तसेच नेमणूक रद्द करण्याचे अधिकार सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांना राहतील.

वरील अर्हताप्राप्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज आस्थापना विभाग, रविंद्रनाथ टॅगोर आर्ट गॅलरी, विभागीय कार्यालय (पश्चिम), उत्तर अंबाझरी रोड, नासुप्र जलतरण तलावासमोर नागपूर–४४००३३ यांचेकडे दि. ८/९/२०१६ पर्यंत पाठवावेत. या तारखेनंतर प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अर्जासोबत अर्जदाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो, सेवानिवृत्तीच्यावेळचे वेतन, निवृत्तीवेतनाचे साक्षांकीत कागदपत्रे व कामाच्या अनुभवाचे सक्षम प्राधिकाऱ्याकडील प्रमाणपत्र जोडावे.

**कार्यकारी अधिकारी**
**नागपूर सुधार प्रन्यास नागपूर**